# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**प्रवेश व पात्रता विभाग**

**कबचौउमवि/६/प्र.पा./27/२०२४** दि. २७.०४.२०२४ 29.04.2024

**प्रति,**
मा.प्राचार्य/संचालक/ विभागप्रमुख
संलग्नित महाविदयालये/ विदयापीठ शैक्षणिक प्रशाळा/ संस्था.
यांना..

**विषय: भारतीय भाषामध्ये शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देणे बाबत.**
**संदर्भ:**१)विद्यापीठ अनुदान आयोग यांचे कडुन प्राप्त दि.२०/०३/२०२४रोजी प्राप्त Email आदेश.
२)मा.कुलगुरु सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्याकडील पत्र.क्र व्हीसी/१३९,दि.२०/०३/२०२४ चे पत्र.
३)मा.प्र-कुलगुरु कार्यालयाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/प्रकुका/१६/२०२४, दि. २२.०३.२०२४

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयांस अनुसरुन, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने सर्व उच्च शिक्षणातील सर्व अभ्यासक्रमाचे पाठयपुस्तके व संदर्भ ग्रंथ मराठी भाषेत विद्यापीठासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी विविध बाबींवर चर्चा करण्यासाठी उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार दिनांक २०/०३/२०२४ रोजी मा.प्रा.जगदीशकुमार, अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्या सहकार्याने Online बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत पद्मश्री चामुशास्त्री व प्रा.जगदीशकुमार यांनी मार्गदर्शन केले. सदर बैठकीतील सारांश खालील प्रमाणे असून आपणास संदर्भीय पत्र ३ पाठविण्यात आले आहे.

१) विषयातील उच्चशिक्षीत विविध अभ्यासक्रमातील मराठी शैक्षणिक साहित्य भारतीय भाषामध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी विविध राज्यामध्ये Nodal Officer यांची नियुक्ती करण्यात आली असुन मराठी भाषेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु यांची Nodal Officer म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.

२) सदर शैक्षणिक साहित्य मराठी भाषेत उपलब्ध करुन देण्यासाठी विविध पाठयपुस्तके व संदर्भ ग्रंथ लिखाणचे कार्य इच्छुक/ लेखक / प्राध्यांपका कडुन करुन घ्यावे असे ठरले आहे.

३) सदर पाठयपुस्तके व संदर्भग्रंथ हे विद्यापीठ अनुदान आयोग स्वत: हा प्रकाशीत करणार असुन २ (Online/ Print माध्यम) सदर पुस्तकांचे बौध्दीक संपदा हक्क हे विद्यापीठ अनुदान आयोग व संबंधित विद्यापीठ यांचे असतील.

४) सर्व लिखाण केलेले पाठयपुस्तके व संदर्भग्रंथ हे विदयार्थ्यांना संख्येतस्थळांवर विनामुल्य विद्यापीठ अनुदान आयोग मार्फत उपलब्ध करुन दिले जातील.

५) सदर काम करण्यासाठी विद्यापीठाला विद्यापीट स्तरावर Nodal Officer ची नियुक्ती करावी लागेल.

६) देश पातळीवर वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखा तसेच विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत भारतीय भाषामध्ये उपलब्ध शैक्षणिक साहित्यांचे प्रमाण तुलनेने खुप कमी असल्यामुळे या विद्याशाखामधील पाठयपुस्तके व संदर्भ ग्रंथ लिखाणाचे काम अधिक प्राध्यान्याने केले जावे असे सांगण्यात आले.

..२

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle) जळगाव-४२५००१

वरिल चर्चेच्या अनुषगांने आपल्या विद्यापीठाने मराठी शैक्षणिक साहित्य निर्मीतीसाठी विद्यापीठ Nodal Officer म्हणुन प्रा.आशुतोष पाटील भ्रमणध्वनी (९८२३३६५१९०) यांची नियुक्ती केलेली आहे.सदर विषयांचे गाभीर्य / महत्व लक्षात घेता विद्यापीठाने पाठयपुस्काची नवीन निर्मीती व उपलब्ध निवडक शैक्षणीक साहित्यांचे IIT मुंबई यांच्या उडान प्रणाली द्वारे मराठीत भांषातर व तज्ञांकडुन त्यांचे समिक्षण व दुरुस्ती अश्या दोन्ही पर्यायाचा अवलंब करण्याचे ठरविले आहे. तरी या अनुषंगाने आपणास विनंती की. . . . .

**पर्याय:-१)** ज्या इच्छुक अनुभवी तज्ञ प्राध्यापकांना पाठयक्रम व पुस्तके संदर्भग्रंथ लिहिण्यात रस असेल अश्या प्राध्यापकांकडुन तसे प्रस्ताव विदयापीठाच्या विहित नमुन्यात (प्रपत्रक जोडलेले आहे) भरुन मा. प्राचार्य /संचालक यांचे मार्फत विद्यापीठ Nodal Officer यांच्या कडे ३१/०३/२०२४ पर्यंत सादर करावे.

**पर्याय:-२)** उपलब्ध पाठयपुस्तके /संदर्भग्रंथ यांचे IIT मुंबई यांच्या उडान प्रणाली द्वारे भाषांतर करुन सदर भांषातरांचे समिक्षण व दुरुस्ती करण्या बाबत इच्छुक अनुभवी तज्ञ प्राध्यांपकांनी विहित नमुन्यात विद्यापीठास आपआपले प्रस्ताव सादर करावे.

**पर्याय:- ३)** सदर पाठयपुस्तके व संदर्भग्रंथ हे लिखणाचे कार्य कालमर्यादीत असल्यामुळे त्यासाठी लेखकांना सहा महिने इतका कालावधी बंधनकारक असेल.

तरी उपरोक्त संदर्भात आपण आपल्या स्तरावर सुरु असलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.१५ मे २०२४ पर्यंत प्रवेश व पात्रता विभागास सादर करुन विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती

कळावे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle) जळगाव-४२५००१

**आपला विश्वासू**

**सहायक कुलसचिव**
(प्रवेश व पात्रता विभाग)

**सोबत :**मा.प्र-कुलगुरु कार्यालयाचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/प्रकुका/१६/२०२४,
दि. २२.०३.२०२४ सत्यप्रत.

**प्रत माहितीस्तव:**

१) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगाव.
२) मा.अधिष्ठाता ,सर्वविद्याशाखा कबचौउमवि, जळगाव
३) प्रा.आशुतोष पाटील, नोडल ऑफीसर, कबचौउमवि, जळगाव